# उपविभागीय अधिकारी व दंडाधिकारी मुंबई पश्चिम उपनगर यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, ९ वा मजला, शासकीय वसाहत, बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१ .

---

## भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम,२०१३ चे कलम २१, खंड (१) व (२) अन्वये प्रसिध्द करावयाचे

**- प्रकटपत्र -**

याद्वारे, जाहिररीत्या नोटीस देण्यात येते की, सन २०१३ चा अधिनियम कलम १९ अन्वये महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रातील असाधारण भाग क्र.-१ कोकण विभागीय पुरवणी मधील असाधारण क्रमांक ४३, बुधवार मे, २९, २०१९ मधील प्राधिकृत प्रकाशना मार्फत क्रमांक **उविअ/कावि/एलएक्यु/एसआर-१६/२०१७,** आणि **फ्रि प्रेस जरनल** या इंग्रजी दैनिक वृत्तपत्रात दि. ०१/०६/२०१९ व **कोकण पुढारी** या दैनिक मराठी वृत्तपत्रात दि. १२/०६/२०१९ रोजी प्रसिध्द केली आहे.

तथापि नगर भूमापन अधिकारी, अंधेरी यांनी दि.२९/०९/२०१९ रोजी केलेली संयुक्त मोजणी व त्यानुसार सादर केलेला दि. ०७/११/२०१९ रोजीच्या संयुक्त मोजणी अहवालाचे अवलोकन केले असता, भूसंपादनाखाली येणारे क्षेत्र हे १३८७०.०० चौ.मी. असल्याचे नमूद केले आहे. भूसंपादन संस्था असलेल्या मुंबई महानगरपालिकेने देखील त्यांच्या दि. १५/११/२०१९ रोजीच्या पत्राने १३८७०.०० चौ.मी. हे क्षेत्र अंतिम समजण्याचे कळविले आहे. या अनुषंगाने या कार्यालया मार्फत उपरोक्त नमूद केलेल्या व प्रसिध्द केलेल्या कलम १९ च्या अधिसूचनेस आज दि. १६/११/२०१९ रोजी दुरुस्ती सुचविण्यात आली आहे. त्यानुसार सन २०१३ चा अधिनियम क्र. १ अन्वये शासन पर्जन्य जल उदचंन केंद्र भूसंपादन या सार्वजनिक प्रयोजनासाठी घेण्याच्या विचारात आहे.

तरी सदरहू जमिनीत हितसंबंध असणा-या किंवा हितसंबंध असणा-या व्यक्तीसाठी काम चालविण्याचा तुम्हास हक्क असेल तर, तुम्हाला याव्दारे फर्माविण्यात येत आहे की, तुम्ही **उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर, प्रशासकीय इमारत, ९ वा मजला, शासकीय वसाहत, बांद्रा (पू), मुंबई-४०००५१ यांच्या कार्यालयात दिनांक २०/१२/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता** जातीने किंवा अभिकर्त्यामार्फत हजर राहून सदरहू जमिनीतील तुमच्या हितसंबंधाचे स्वरूप आणि त्या संबंधातील तुमच्या भरपाई संबंधीच्या दाव्याची रक्कम व तपशिल आणि उक्त अधिनियमाच्या कलम २० अन्वये केलेल्या मोजणी संबंधाने तुमच्या काही हरकती असतील तर त्या जातीने किंवा मुखत्यारामार्फत लेखी स्वरूपात दोन प्रतीमध्ये सादर कराव्यात.

**परिशिष्ट**

जिल्हा : मुंबई उपनगर	तालुका : अंधेरी	गांव : ओशिवरा

| गांव | नगर भूमापन क्रमांक | संपादनाखालील जमिनीचे क्षेत्र (चौ.मी.मध्ये) |
|---|---|---|
| ओशिवरा | जुना १ पै, नवीन ७३९ पै | १३८७०.०० |

**ज्यासाठी जमीन आवश्यक आहे ते प्रयोजन : -** पर्जन्य जल उदचंन केंद्र या प्रयोजनासाठी भूसंपादन

बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१
दिनांक : /११/२०१९

(उमेश बिरारी )
**उपविभागीय अधिकारी**
**मुंबई पश्चिम उपनगर**

D:\२०१८-२०१९\Bhusampadan\२१ & २२ Section Notice.docx३३